**कि. फौ. अर्ज. क्र.–४०८/२०२५** **निशाणी ०१ पुरवणी**

**फिर्यादीचे सत्यापन**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो/करते की,</u>**

**नाव :** बाबासाहेब शांताराम राक्षे,

**वय :** ४९ वर्षे, **व्यवसाय / नेमणूक :** शेती,

**निवासस्थान / नेमणूक :** साळुंब्रे ता. मावळ, जि. पुणे

**शपथेवर सत्यापन –**

**०१.** आमची गट नं. २३८ मध्ये साळुंब्रे येथे १ हे. ६७ आर जमीन होती. आम्ही त्यापैकी ३६ आर क्षेत्र विक्रीस काढले. आरोपींच्या सोबत आमची विसार पावती झाली. ३६ आर क्षेत्राची किंमत दोन कोटी त्र्याऐंशी लाख ठरली. विसार म्हणुन आरोपींनी आम्हाला विस लाख रुपये दिले. तिन महिन्यात व्यवहार पुर्ण करायचा होता. तिन महिन्यानंतर दस्त नोंदणीसाठी त्यांनी तिन दस्त करण्यासाठी आग्रह धरला. त्याप्रमणे १०.२२ आर, १०.२२ आर व १५.५ आर क्षेत्राचे तिन खरेदीदस्त केले. खरेदीदस्तात नमूद करुन आरोपींनी आम्हाला एकुण एक कोटी शेहचाळीस लाख रुपयाचे चेक दिले. ते सर्व चेक न वटता परत आले. आम्ही वारंवार आरोपींना चेक मधील नमुद रक्कम देण्याची विनंती केली. त्यांनी टाळाटाळ करुन तिन महिने घालवले. आरोपींनी विनामोबदला ताबा घेण्याचा प्रयत्न केला. आम्ही पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलीसांनी कारवाई केली नाही. पोलीसांनी कोर्टात जावा असे सांगितले. स्पेशल दिवाणी दावा क्र. १४९/२०२५, १५०/२०२५ व २२३/२०२५ दस्त रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. तरी आरोपींच्या विरुध्द कारवाई करावी.

**सत्यापन पूर्ण.**

**फिर्यादीची सही**

Digitally signed by SHARADCHANDRA PANDITRAO JADHAV
Location: 3rd Jt. Civil Judge J. D, JMFC, Vadgaon Maval.
Date: 2025.12.20 17:32:39 +0530

दि. २०/१२/२०२५ **(एस. पी. जाधव)**

ठिकाण– वडगाव मावळ

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

वडगाव मावळ, जि. पुणे